# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (लांजा तालुका)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक १५/२०१९** **दिनांक १८/०२/२०१९** **कालावधी ५ दिवस**


| डॉ. सुभाष चव्हाण, | डॉ. विजय मोरे, | डॉ. शितल यादव, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १२/०२/२०१९ ते १८/०२/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १९/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून २३/०२/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२/०२ | १३/०२ | १४/०२ | १५/०२ | १६/०२ | १७/०२ | १८/०२ | | १९/०२ | २०/०२ | २१/०२ | २२/०२ | २३/०२ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३१.६ | ३२.१ | ३१.६ | ३५.४ | - |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | १७.३ | १८.६ | १९.५ | २०.६ | - |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | ० | ० | ० | - |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७२ | ७९ | ७५ | ६४ | - |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २५ | २७ | ३२ | २६ | - |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ००७ | ००७ | ००९ | ००८ | - |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | उ. | उ. | उ. | इ.पू. | - |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १९ ते २२ फेब्रुवारी २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमान साधारण राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| वाल | काढणी अवस्था | • वाल पिकाची काढणी जसजशा शेंगा वाळतील तसतशी शेंगांची तोडणी करून ४ ते ५ दिवस शेंगा उन्हात वाळवाव्यात व मळणी करावी किंवा शेंगा झाडावर वाळल्यानंतर पिकाची कापणी करून झाडे खळ्यावर ३ ते ४ दिवस उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. साठवणूकीमध्ये भुंग्याचा उपद्रव टाळण्यासाठी वालाचे दाणे मातीच्या खळीचा थर देऊन चांगले वाळवावे. |
| आंबा | मोहोर व फलधारणा अवस्था | • सध्या आंबा पिकामध्ये मोहोर फुटण्याची व वाटाण्याच्या आकाराची फळे येण्याची अवस्था असून त्यावर तुडतुड्याचा आणि फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार पाचवी फवारणी (चौथ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि. ली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि. ली. + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• फळगळ कमी करण्यासाठी फलधारणा झाल्यावर पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रती झाडास या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ पाळ्या दयाव्यात.<br>• फळ वाटणा आकारचे असताना फळाचा आकार, फळाचे वजन फळामधील साका आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० आकाराची पेपर पिशवी लावावी. |
| काजू | बी अवस्था | • काजूमध्ये सध्या मोहोर व बी अवस्था असून त्यावर फुलकिडीचा व ढेकण्या किडीचा (टी मॉस्कीटो बग) प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि. ली. कीटकनाशकाची प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत)<br>• नवीन काजू लागवडीतील कलमांना गवताचे आच्छादन करून नियमित पाणी दयावे. |
| नारळ | - | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी नारळ बागेमध्ये शेणखताच्या खड्यात अळ्यांना मारण्यासाठी दर दोन महिन्यांनी क्लोरोपायरीफॉस २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>• नारळ बागेत ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. |
| मसाले पिके | फळपक्वता | • काळीमिरीच्या घोसातील १ ते २ दाणे पिवळे किंवा तांबडे लाल होताच मिरीची काढणी करावी व दुसऱ्या दिवशी मिरीचे दाणे घोसापासून वेगळे करून बांबूच्या करंडीत किंवा मलमलच्या कापडात भरून उकळत्या पाण्यात एक मिनिटे बुडवावेत व उन्हामध्ये ३ ते ४ दिवस चांगले वाळवावे. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | काढणी अवस्था | • वेलवर्गीय भाजीपाला पिकावर फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने माशीच्या नियंत्रणासाठी शेतात "रक्षक" सापळा प्रति हेक्टरी ४ नग या प्रमाणात लावावेत.<br>• उन्हाळी हंगामात भेंडीची लागवड ४५ x १५ से.मी. अंतरावर करावी. लागविच्या वेळेस १५ टन शेणखत, ७२ किलो युरिया, ३१३ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ८३ किलो म्युरेट ऑफ पोटाश प्रती हेक्टरी खताची मात्र द्यावी.<br>• फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• किमान तापमानात घट होत असल्याने रात्रीच्या वेळेस जनावरांच्या गोठयात तसेच कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे व दिवसा गोठयाची दारे व खिडक्या खुली ठेवावीत जेणे करून हवा खेळती राहील. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**